# रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी

आणि

# सावरकर दर्शन प्रतिष्ठान

आयोजित

## हिंदुत्व अध्ययन (परिचय) प्रमाणपत्र अभ्यासक्रम

### दिनांक : ७, ८, ९ नोव्हेंबर, २००८

---

## अहवाल

**रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी** आणि **सावरकर दर्शन प्रतिष्ठान** यांच्या संयुक्त विद्यमाने **दिनांक ७, ८, ९ नोव्हेंबर, २००८** रोजी **हिंदुत्व अध्यन (परिचय) प्रमाणपत्र अभ्यासक्रम** प्रबोधिनीच्या ज्ञान नैपुण्य केंद्रात आयोजित करण्यात आला होता. या प्रकारच्या पहिल्यांदाच राबविण्यात आलेल्या या अभ्यासक्रमात १४ जिल्ह्यांमधून १८ संस्थांचे ३ महिला व ५३ पुरूष असे ५६ प्रतिनिधी सहभागी झाले होते.

आंतरराष्ट्रीय राष्ट्रवादाच्या संदर्भात भारतीय राष्ट्रवादाचा म्हणजेच हिंदुत्वाचा, राज्यशास्त्रीय दृष्टीकोनातून अभ्यास करु इच्छिणाऱ्या युवा कार्यकर्त्यांना या विषयाची ओळख करुन देणे. त्यांना अध्ययनासाठी आवश्यक त्या संदर्भ साहित्याची माहिती करुन देणे. हिंदुत्व चळवळीतील अभ्यासू कार्यकर्त्यांना प्रोत्साहन देणे हा या **अभ्यासक्रमाचा हेतू** होता.

एकूण तीन दिवसांच्या या अभ्यासक्रमाचे **उद्‍घाटन** ज्येष्ठ विचारवंत व हिंदुत्वाचे अभ्यासक **मा. श्री. ज. द. जोगळेकर** याच्या हस्ते झाले. यात त्यांनी भूमिनिष्ठा व पंरपरा राष्ट्रवादासाठी आवश्यक आहे असे सांगितले. राष्ट्रवाद पाहताना युरोपाचा इतिहास अभ्यासणे गरजेचे आहे. शेवटी अभ्यासक्रमातून राष्ट्रवादाच्या अभ्यासाविषयी संस्थात्मक रचना निर्माण व्हावी अशी अपेक्षा व इच्छा व्यक्त केली.

सा. विवेकचे प्रबंध संपादक **मा. श्री. दिलीप करंबेळकर** यांनी **अभ्यासक्रमाची संकल्पना व भूमिका** स्पष्ट केली हे सांगताना त्यांनी सांगितले की हिंदुत्वाचा राजकीय आराखडा आकारास येण्याची गरज आहे आणि हे अशा प्रकारच्या अभ्यासवर्गाचे दीर्घकालीन उद्दिष्ट आहे. एकत्व, विशेषत्व, चैतन्यशीलता या त्रिसूत्रीच्या आधारे राष्ट्रवादाचा विचार अभिव्यक्त होतो.

**राष्ट्रवादाचा उद्‍य व वाटचाल** हा विषय पहिल्या दोन सत्रांमध्ये **प्रा. म. मो. पेंडसे** यांनी मांडला. राष्ट्रवादाचा उदय जर्मनीतून कसा झाला हे सांगितले. इहवाद, व्यक्तिची प्रतिष्ठा, राष्ट्रवाद व मानववाद या संकल्पना स्पष्ट केल्या. प्रबोधनाचे परिणाम कसे घडले. मार्टिन ल्युथर, हर्डर यांची मते मांडली.

**राष्ट्रवादाचे भाष्यकार (विचारवंत)** या सत्रात **मा. दिलीप करंबेळकर** यांनी विविध विचारवंताचे राष्ट्रवादाबद्दलचे मत मांडले. सुरुवातीस त्यांनी ख्रिस्ती मूलतत्वे सांगितली त्यानंतर मार्टिन ल्युथर, निकोलो मॅकिआव्हिली, रेने देकार्त व थॉमस हॉब्स या विचारवंताबद्दल सांगितले.

**प्रा. अविनाश कोल्हे** यांनी **राष्ट्रवादाचे भाष्यकार (राजकीय नेते)** हा विषय मांडला. यामध्ये त्यांनी युरोपीय राष्ट्रवादाचा विकास राजसत्ता व धर्मसत्ता यांच्या संघर्षातून झाला तर भारताचा परकीय आक्रमकाविरुद्ध लढून झाला असे सांगितले तसेच फ्रान्समधील रिशेल्यू व तालेरॉ, इटलीमधील कॅव्हूर, हंगेरीमधील कोसूद, तुर्कस्थानचा केमाल पाशा व भारतातील सरदार पटेल या राजकीय नेत्याचे राष्ट्रवादाविषयीची भूमिका स्पष्ट केली.

**डॉ. आत्माराम कुलकर्णी** यांनी **राष्ट्रवाद आणि आंतरराष्ट्रवाद (मार्क्सवाद, इस्लाम, व चर्च)** या सत्रात त्यांनी मार्क्सवाद, इस्लाम, व चर्च यांना धरुन राष्ट्रवाद व आंतरराष्ट्रवाद कसा चालतो हे स्पष्ट केले.

**डॉ. उत्तरा सहस्त्रबुद्धे** यांनी **भारतीय उपखंडातील राष्ट्रवादाचा विकास** यात भारतीय उपखंडातील विविध देशात (पाकिस्तान, बांग्लादेश, इराण, श्रीलंका, नेपाळ, चीन) राष्ट्रवादाचा विकास कसा होत गेला, त्यामध्ये विविध बदल कसे होत गेले हे सोदाहरण सांगितले.

यानंतरच्या सत्रात **भारतीय राष्ट्रवादाचा विकास** हा विषय **डॉ. अशोक मोडक** यांनी मांडला यामध्ये त्यांनी अगदी प्राचीन काळापासूनची म्हणजे राम, कृष्ण, शिवाजी, आंबेडकर, महावीर, बुद्ध, फुले इथपासून उदाहरणे देवून राष्ट्रवादाचा विकास कसा होत गेला हे सांगितले.

**कॉँग्रेस प्रणीत हिंदी राष्ट्रवाद** या विषयावर बोलताना **ॲड. किशोर जावळे** यांनी कॉँग्रेसप्रणीत राष्ट्रवाद म्हणजे काय तो कसा विकसित होत गेला तसेच राष्ट्रवादाचा उदय व विकास तीन अवस्थांमध्ये होतो असे त्यांनी सांगितले. या संदर्भातील काही पुस्तके ही त्यांनी सुचवली.

**श्री. आनंद हर्डीकर** यांनी **भारतीय कम्युनिस्ट इस्लाम व ख्रिस्ती समाज स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर भूमिका** या विषयावर प्रकाश टाकला. यामध्ये त्यांनी तिन्ही धर्मसत्ता स्पष्ट केल्या. तिन्ही विचारप्रवाह विघटनकारी, विस्तारवादी देणारे आहेत. कम्युनिस्टांची भूमिका बदलली म्हणून टीका करण्यापेक्षा अधिक महत्त्वाचे आहे ते भूमिकेबद्दलची कारणामीमांसा करणे. ख्रिश्चन धर्मसत्ता साम्राज्यवादी होती, कारगील घुसखोरीची

माहिती मुसलमान मेंढपाळाने दिली, अशी उदाहरणे देवून त्यांनी प्रत्येक धर्मसत्तेबद्दल सांगितले.

**हिंदुत्व आणि राष्ट्रवाद (स्वा. सावरकर)** हा विषय **श्री. अरविंद बाळ** यांनी स्पष्ट केला. यामध्ये श्री. अरविंद बाळ यांनी सावरकरांनी मांडलेले अद्ववाद/ इहवाद, बहुसंस्कृतीवाद हे स्पष्ट केले. सेक्युलॅरिझम यावर त्यांनी प्रकाश टाकला.

**श्री. विनय सहस्त्रबुद्धे** यांनी **हिंदुत्व आणि राष्ट्रवाद (राष्ट्रीय स्वयंसेवक संघ)** हा विषय मांडला. यामध्ये यांनी हिंदुत्वाच्या मांडणीपासून सुरवात केली. हिंदुत्वाचा अपप्रचार कसा होतो, हिंदुत्वाच्या भूमिका काय आहेत हे स्पष्ट केले.

यानंतर सर्व सहभागीची एक लेखी परीक्षा घेतली गेली.

सर्वात शेवटी **समारोप सत्र** झाले. समारोपासाठी सावरकर दर्शन प्रतिष्ठानचे अध्यक्ष, रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीचे उपाध्यक्ष, खासदार **प्रा. बाळासाहेब आपटे** हे उपस्थित होते. यांनी हिंदू आणि हिंदूराष्ट्र याबाबत सांगितले. हिंदूच्या जीवनपद्धतीबद्दल त्यांनी उहापोह केला.  वंदेमातरम् या गीताने कार्यक्रमाचा शेवट झाला.

सहभागीच्या अभिप्रायावरुन अभ्यासक्रमाची संकल्पना चांगली होती. पुढील काळात असे कार्यक्रम योजण्यात यावे असे त्यांनी सुचविले. काही जणांनी सांगितले की हिंदुत्व या विषयाची वेब साईट बनवावी जेणेकरुन याविषयीची सर्व माहिती कधीही कुणालाही सर्च करता येवू शकते. अभ्यासक्रमासाठी बोलवलेले वक्तेही चांगले होते. असे सुचविण्यात आले.

**********